N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर
**P.S.(ठाणे):** विजापुर नाका
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0398
**Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/08/2025 07:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 21/08/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/08/2025
**Time From (वेळेपासून):** 14:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:49 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/08/2025
**Time (वेळ):** 06:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 013
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/08/2025 07:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** वस्तु व सेवा कर कार्यालयसोलापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** करण मल्लिकार्जुन कांबळे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2002
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो वाकी घेरडी,ता- सांगोला,जि-सोलापुर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो वाकी घेरडी,ता- सांगोला,जि-सोलापुर,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9356055454

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश जरीचंद चौधरी | | | 1. 18,हरिशचंद्र नगर, जुना उपळा रोड,धाराशिव,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | आमसिध्द इराण्णा बगले | | | 1. जी 171,रेणुका नगर, जुळे सोलापूर,सोलापुर,विजापुर नाका,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

पंचानामा ठिकाणी फिर्यादीची उपस्थिती आवश्यक असल्याने व्हाईसरेकडींग पुर्ण ऐकुन त्यातील आवाज ओळखण्यासाठी सहाय्य करणे व पंचनामाकामी फिर्यादी उपस्थित आवश्यक असल्याने



Scanned with OKEN Scanner

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारलेली रक्कम 5000/ रू. | 5,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 22/08/2025

मी श्री. करण मल्लिकार्जुन कांबळे, वय 23 वर्षे, व्यवसाय - खाजगी जमीन मोजणी व बांधकाम ठेकेदार, रा. मु. वाकी घेरडी, ता. सांगोला, जि. सोलापूर, शिक्षण बी. ए. / सव्हेअर, मो.क्रं. 9356055454 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून मी सन 2021 पासून खाजगी जमीन मोजणीचे काम करत असुन त्यामधुन मिळणारे उत्पन्नावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी नव्यानेच अधिराज कंन्स्ट्रक्शन अँन्ड सर्व्हिंग या फर्मचे नावे बांधकाम ठेकेदारीचा व्यवसाय सुरू करणेकरिता सदर व्यवसायासाठी लागणारे जी.एस.टी. नंबर काढून मिळणेकामी वस्तु व सेवा कर कार्यालय, सोलापूर यांचेकडे दि. 28/03/2025 रोजी ऑनलाईन अर्ज केलेला होता. त्याचा अर्ज नं. ARN –AA 2703251617436 असा होता. सदरचा अर्ज माझे वडिलांचे पॅन कार्ड वर सही नाही या कारणास्तव वस्तु व सेवा कर कार्यालय, सोलापूर यांचेकडून रद्द करणेत आलेला होता.

त्यानंतर मी दि. 14/07/2025 रोजी पुन्हा नव्याने सर्व कागदपत्राची पुर्तता करून ऑनलाईन पध्दतीने माझे अधिराज कंन्स्ट्रक्शन अँन्ड सर्व्हिंग या फर्मचे नावे नवीन जी.एस.टी. नंबर मिळणेसाठी अर्ज सादर केलेला आहे. दि. 12/08/2025 रोजी माझा मोबाईल नं. 9370094788 यावर मोबाईल नं. 9822743100 यावरून चार मिस्ड कॉल आलेले होते. सदरचा अनोळखी नंबर असलेने मी तो फोन उचलला नव्हता. त्यानंतर दि. 13/08/2025 रोजी सकाळी 10.53 वा. चे सुमारास पुन्हा त्याच मोबाईल नंबरवरून GST Office Solapur असा मेसेज आला व त्यानंतर 10.59 वा. त्यांनी फोन केला. त्यामुळे मी तो फोन उचलला त्यावेळी त्यांनी त्यांचे नाव बगले कर निरीक्षक असे सांगुन माझे अर्जाचे अनुषंगाने माझेकडे चौकशी केली व माझेकडून त्यांना काही कागदपत्रे हवी असून त्या अनुषंगाने दुपारी 2 ते 3 वा. चे दरम्यान फोन करणेस सांगितले. मला त्यांचे बोलणेवर विश्वास न बसलेने मी त्यांना फोन केला नाही. त्यानंतर त्यांनी वारंवार फोन केल्याने मी दि. 18/08/2025 रोजी फोन उचलला असता त्यांनी त्याच दिवशी त्यांचे कार्यालयास येण्यास सांगितले. परंतु मी बाहेर असलेने दि. 19/08/2025 रोजी येतो असे सांगितले होते. परंतु माझे कामामुळे मी गेलो नाही. त्यामुळे त्यांनी दि. 21/08/2025 रोजी सकाळी 08.15 वा. माझे 9356055454 यावर त्यांचा मोबाईल क्र. 9822743100 वरून फोन कॉल करून व्हॉट्स अँप कॉल उचलण्यास सांगून माझे व्हॅट्सअँप वर कॉल केला व त्यांनी मला काही कागदपत्रे आणण्यास सांगून व आपण बघू साहेबांना बोलू, नाही झाले तर पर्यायी मार्ग सांगतो इथे आल्यावर असे म्हणून चौधरी साहेबांची फी दयावी लागेल असे सांगितले. त्यावेळी मी किती असे विचारले असता त्यांनी जितक्या जास्त अडचणी तेवढी फी जास्त असती, वगैरे वगैरे असे म्हणून 5000/- रू दयावे लागतील असे म्हणाले त्यावर मी त्यांना त्याची पावती मिळेल काय असे विचारले असता त्यांनी त्याची पावती नसते. तुझे अर्जावरून जीएसटी नंबर मंजूर करायचे काम चौधरी साहेब यांचेकडे असून त्यांना तु 5000/- रू दिलास तरच तुझे जी.एस.टी. नंबर मिळेल असे म्हणून माझे अर्जावरून अधिराज कंन्स्ट्रक्शन अँन्ड सर्व्हिंग या फर्मचे नावे नवीन जी.एस.टी. नंबर काढून देणेकरिता 5000/- रू. लाचेची मागणी केलेली असून कागदपत्रे व लाच रक्कम घेवून दिनांक



Scanned with OKEN Scanner

21.08.2025 रोजी दुपारी फोन करूनच त्यांचे जी.एस.टी. कार्यालय सोलापूर येथे येणेस सांगितलेले होते. जी.एस.टी. कार्यालय सोलापूर येथील बगले साहेब हे माझे फर्मचे नावे नवीन जीएसटी नंबर काढून देणेसाठी चौधरी साहेबाची फी दयावी लागेल म्हणून लाचेची मागणी करीत असल्याचे लक्षात आल्याने आणि त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 21/08/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथील डी.वाय.एस.पी. श्री. चौगुले साहेबांना फोन करून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली असता, त्यांनी दि.21/08/2025 रोजी दुपारी 12.30 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येऊन पोनि पवार यांना भेटण्यास सांगितले.

दि.21/08/2025 रोजी दुपारी 12.30 वाजण्याचे सुमारास मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे येवून पोनि. पवार यांची भेट घेवुन माझी तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि पवार यांनी सोलापूर महानगरपालिकेकडून दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व माझी तसेच पंच क्र. 01 श्री. आशिष संजय जाधव पद- उदयान अधीक्षक, सोलापूर महानगरपालिका व पंच क्र. 2. श्री. शिवप्रसाद रमेशराव चिंचोळ पद- कनिष्ठ श्रेणी लिपिक, सोलापूर महानगरपालिका यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पंचासमक्ष राज्य कर निरीक्षक श्री. बगले यांनी माझे अधिराज कंन्स्ट्रक्शन अँन्ड सर्व्हिंग या फर्मचे नावे नवीन जी.एस.टी. नंबर काढून देण्याकरीता चौधरी साहेबांची फी दयावी लागेल असे म्हणून माझेकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करत असल्याबाबतची सविस्तर तक्रार सांगुन माझ्या हस्ताक्षरात लेखी तक्रार दिली. सोबत मी वस्तु व सेवा कर कार्यालय, सोलापूर यांचेकडे ऑनलाईन केलेल्या अर्जाची प्रत, माझे वडीलांचे संमती पत्र,ग्रामपंचायत वाकी घेरडी यांची पावती, उदयम प्रमाणपत्र या कागदपत्राच्या छायांकित प्रती तक्रारी अर्जासोबत जोडून दिल्या. त्यावर माझी सही केली त्यानंतर पोनि पवार, पंच श्री. आशिष संजय जाधव व श्री. शिवप्रसाद रमेशराव चिंचोळ यांनी सहृा केल्या.

त्यानंतर पोनि पवार यांनी श्री. बगले व श्री. चौधरी याची पडताळणी करण्याचे ठरवून सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून श्री. आशिष संजय जाधव व पंच क्र. 2. म्हणून श्री. शिवप्रसाद रमेशराव चिंचोळ असे काम करायचे ठरविले. त्यानंतर पोनि. पवार यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून व्हाईस रेकॉडरचा वापर व उपयोग याबाबत संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड माझेसमक्ष टाकले. त्यानंतर माझे व पंचाचे पडताळणीपुर्व निवेदन व्हाईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आले.

त्यानंतर पोनि पवार यांनी पडताळणी कामी मला व पंच नं. 1 जाधव यांना योग्य त्या सूचना दिल्या. श्री बगले यांनी मला त्यांना दुपारी भेटण्यास येताना फोन करूनच येण्यास सांगितलेले असलेने ते कार्यालयात आहेत अगर कसे याबाबत खात्री करणेसाठी पो.नि. पवार यांचे सुचनेवरून 14.45 वा. मी माझा मोबाईल क्र. 9356055454 यावरून श्री. बगले यांचा मोबाईल क्र. 9822743100 यावर फोन लावून स्पीकर ऑन करून बोलणे केले. तेव्हा बगले यांनी मी. अनगर वरून मोहोळ ला येत आहे. अर्धा तासात सोलापूरत येतो, एसटी स्टॅन्डवर आलेनंतर कॉल करतो तेव्हा या असे सांगितले. सदरचे संभाषण पोनि पवार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत केले. श्री बगले यांना येणेस अर्धा तास लागणार असलेने बगले यांचे कॉलची वाट पाहत लाप्रवि कार्यालयात थांबून राहिलो.

त्यानंतर 15.08 वा. चे सुमारास श्री. बगले यांचा त्यांचे मोबाईल नंबरवरून माझे मोबाईल नंबर वर मिस्ड कॉल आला. त्यामुळे मी 15.10 वा. माझे फोनवरून श्री बगले यांना कॉल करुन स्पीकर ऑन केला. त्यावेळी बगले यांनी एस.टी त बसलोय अर्धा तासात येतो असे सांगितले. त्यावर मी त्यांना आलेनंतर कॉल करा असे म्हणलो. सदरचे संभाषण पोनि पवार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पुन्हा 15.57 वा. श्री बगले यांनी माझे वरील मोबाईल नंबरवर फोन केला त्यावेळी मी फोनचा स्पीकर ऑन केला. त्यावेळी त्यांनी कार्यालयात 10 मिनीटात येत असलेबाबत सांगितले. सदरचे संभाषण पोनि पवार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोनि पवार, पोनि पिंगुवाले, मी व दोन्ही पंच असे माझेकडील चारचाकी वाहन एमएच 45 ए. झेड. 0643 या वाहनातून व सापळा पथक शासकीय वाहन क्र. एम.एच. 12 यु.सी. 4108 यामधून सोलापूर शहरातील अंत्रोळीकर नगर येथे जावून थांबून राहीलो. सदर ठिकाणी पोनि पवार यांनी मला व पंच नं. 1 यांना पुन्हा एकदा सर्व सुचना देवून त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझ्या शर्टाच्या आतील बनियनच्या आतमध्ये कोणास दिसणार नाही असे अडकविले. त्यानंतर मला श्री बगले व श्री चौधरी यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.1 जाधव यांच्यासह माझी किया कंपनीची कारेन्स, पांढरे रंगाची चारचाकी वाहन क्र. एमएच 45 ए. झेड. 0643 यावरुन 16.10 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 असे दोघे वस्तु व सेवा कर कार्यालयाजवळ जावून श्री बगले यांचे फोनची वाट पाहत थांबून राहीलो. बराच वेळ थांबलेनंतर श्री बगले यांचा फोन न आलेने मी माझे वर नमुद मोबाईलवरून त्याचा मोबाईल नं. 9822743100 यावर फोन करुन स्पीकर ऑन केला. त्यावेळी श्री बगले यांनी मला ऑफीसला आलोय तुम्ही आले नाही वर या की असे म्हणालेने मी व पंच नं. 1 असे वस्तु व सेवा कर कार्यालयाचे आत गेलो तेथील गेटवरील वॉचमन याचेजवळ माझे नावाची नोंद केली. त्यांनी कुणाकडे जायचे आहे



Scanned with OKEN Scanner

असे विचारले असता मी बगले साहेबांकडे असे सांगितलेने त्यांनी दुसरे मजल्यावर जाण्यास सांगितले त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 जाधव असे वरती जावून चौकशी करून श्री. बगले यांची भेट घेवुन माझे नवीन जीएसटी नंबरचे कामाबाबत चर्चा करीत असताना बगले यांनी पंच नं. 01 जाधव यांना तिकडे बसा असे म्हणाले. त्यावर पंच 01 जाधव हे थोडे बाजुला सरकुन उभे राहिले. त्यावेळी बगले यांनी त्यांचे उजवे हाताचे पाच बोटे दाखवुन आज जर तुम्ही हे दिल तरच होतय असे म्हणाले. त्यावर मी त्यांना साईट बाहेर चालु आहे जवळ एक बी चालु नाही त्यामुळे लय आडचण आहे असे म्हणालो त्यावर बगले यांनी फोन करुन घ्याच पटकन साहेब करुन टाका म्हणायच असे म्हणाले. त्यावर ऑनलाईन भरल म्हणल्यावर ऑनलाईन प्रोसीजर होवून जाईल असे वाटले असे म्हणालो. त्यावर बगले यांनी तो पर्यंत सरांना मी बोलून येतो असे म्हणाले. त्यावर मी त्यांना बोलुन या साहेबांना माझी भेट होणार नाही का साहेबांन सोबत असे म्हणालो. त्यावर बगले यांनी होती की भेट असे म्हणून चौधरी साहेब यांचेकडे जावून त्यांना बोलून बाहेर आले त्यावेळी बगले यांनी मला त्यांचे उजवे हाताचे पाच बोटे दाखवून ऐवढ तरी करावे लागतय असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाच हजार का असे विचारले त्यावर बगले यांनी हं असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पाच हजार लय होतय रावसाहेब डॉक्युमेंट सगळ्या गोष्टी झालेत असे म्हणालो. त्यावर बगले यांनी सगळ असुन सुध्दा वरती त्यांना द्याव लागतय बघ असे म्हणाले. त्यावर मी त्यांना जर माझ्या साठी बोलून बघा डॉक्युमेंट क्लिअर आहेत असे म्हणालो. त्यावर बगले यांनी मला माहिती आहे म्हणून तर मी जावुन बोललो असे म्हणुन बगले यांनी मला चौधरी यांचे कक्षात घेवुन गेले. सदर वेळी पंच नं. 01 जाधव हे आमचे मागे येवुन चौधरी साहेबांचे केबीनचे उघडया दरवाजासमोर आम्ही दिसेल असे उभे राहिले. सदर ठिकाणी मी चौधरी साहेब यांना मी जी.एस.टी. साठी आलतो असे म्हणालो. त्यावर चौधरी यांनी कसला बिजनेस आपला असे विचारले असता मी त्यांना कंट्रक्शन अँन्ड सर्व्हिंग असे सांगीतले. त्यावर चौधरी यांनी अधिराज कंट्रक्शन असे विचारले त्यावर मी त्यांना हं असे म्हणुन मी त्यांना बगले साहेबांनी मला सांगीतलेले जास्त होतेय जरा काय आपण कमी करा डॉक्युमेटरी तर क्लिअर आहे साहेब असे म्हणालो. त्यावर चौधरी यांनी त्यांचे उजवे हाताची पाच बोटे दाखवुन रुपये 5000/- लाच रक्कम इशा-याने मागणी करुन सदर लाचेची रक्कम बगले यांचेकडे हाताने इशारा करुन देण्याचे सांगीतले. त्यावर मी बर साहेब करतो बगले साहेबांकडे असे म्हणून मी व बगले चौधरी यांचे कक्षातुन बाहेर आलो. त्यानंतर मी बगले यांना लाईट बील व कॅश घेवुन येतो असे म्हणालो त्यावर बगले यांनी मला लवकर ये सगळया समोर पैसे दयाचे नाहीत असे म्हणून 5000/- रुपये लाचेची रक्कम पिशवी मध्ये घेवुन येणेस सांगीतले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 17.00 वा परत आलो. त्यावेळी पोनि पवार यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद करून ताब्यात घेतला व पंच नं. 1 जाधव व मला पडताळणी दरम्यान घडलेली हकीकत पंच नं. 2 व पोनि पवार यांना सांगावयास सांगितलेने मी व पंच यांनी वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर पोनि पवार यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले. सदर पडताळणी कारवाईदरम्यान श्री बगले व श्री. चौधरी यांनी माझ्याकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि. पवार यांनी श्री बगले व श्री. चौधरी यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व दोन्ही पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देऊन त्याचा वापर व उपयोग सांगुन प्रात्यक्षिक दाखविले. सदर वेळी मी हजर केलेले 5,000 /- रू. रक्कमेच्या नोटांचे क्रमांक पोना/ जाधव यांचे करवी एका कागदावर लिहुन घेतल्यानंतर पोहेकॉ/ घाडगे यांच्या हस्ते नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यावेळी पोनि पवार यांनी पोहेकॉ/ घाडगे यांना सापळा कारवाईत भाग न घेता शासकीय वाहनातच थांबून राहण्यास सांगितले. त्यानंतर पोनि. पवार यांनी माझे व पंच 1 यांचे सापळापुर्व निवेदन व्हाईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेतले. त्यानंतर पोनि. पवार यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील पोनि/ पिंगुवाले, अंमलदार पोहेकॉ मुल्ला, पोना जाधव यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या व श्री बगले अगर चौधरी यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर पंच नं. 1 जाधव यांनी पोनि पवार यांचे मोबाईलवर मिस कॉल देवून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबत सुचना दिली. तसेच सापळा कारवाईनंतर तेथील प्राथमिक तपासण्याचे मोबाईलवर चित्रीकरण करण्याबाबत पोलीस अंमलदार मुल्ला यांना सुचना दिल्या.

त्या दरम्यान माझे मोबाईलवर बगले यांनी मिस्ड कॉल केला. त्यानंतर मी त्यांना 17.13 वाजता फोन करुन स्पीकर ऑन केला. त्यावेळी सदरचे संभाषण पोनि पवार यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरवर ध्वनीमुद्रीत केले. त्यावेळी बगले यांनी हां या लावकर साडेपाच किती वाजले साडेपाच पर्यत येताय ना.. असे म्हणाले. त्यावर मी त्यांना अं..काय झालंय एटीएम मधून पैसे काढलोय पाच हजार रुपये फक्त आता काय झालंय ते प्रिन्ट जी काढायला पाहिजे होती ना लाईट बीलची ती इथ कुंठ भेट ना झाली ते तुम्हाला पीडीएफ केले तर चालल का..असे म्हणालो. त्यावेळी बगले यांनी तुंबळ हॉस्पीटल शेजारी झेरॉक्स दुकानातुन प्रिन्ट काढून आणणेस सांगीतले.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पोनि पवार यांनी सापळा पथक, पंच व मला सापळच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालू करुन माझे व पंच नं. 01 यांचे सापळापूर्व निवेदन घेतले. त्यानंतर पोनि पवार यांनी माझ्या शर्टच्या आतील बाजूस बनियानच्या आत गळयात अडकवून मला व पंच क्र.1 असे दोघांना माझ्याकडील वर नमुद चारचाकी वाहनातून 17.24 वाजता रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पवार, पोनि पिंगुवाले हे पंच क्र.2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून शासकिय वाहन वस्तु व सेवा कर कार्यालय, सोलापूर चे जवळ थांबूवन कार्यालयाचे जवळ कोणास संशय येणार नाही याप्रमाणे सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 असे दोघे वस्तु व सेवा कर कार्यालयाचे बाहेरच गाडी उभी करून कार्यालयाचे दुसरे मजल्यावरील श्री बगले हे बसत असलेल्या कक्षात गेलो सदर वेळी बगले यांनी मला लाईट बील बाबत चर्चा करीत असताना बघु असे बोलुन लाचेची मागणी केली असता त्यावर मी एमएसईबी वाल्याला त्यान अशी बील आणून दिली, तुम्ही म्हटल्याप्रमाणे पाच आणलेत काम तेवढ लवकर होवून जावू द्या माझ...बरं..का.. साहेब.. कारण की आता मला इकडे यायला जमेल न जमेल सांगता येत नाही असे म्हणालो. त्यावर बगले यांनी ठिक आहे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना लाईट बिलांवर माझीच सही मारु असे विचारले असता बगले यांनी हं..खाली मारा असे म्हणाले त्यावर मी सही केली त्यावेळी मी बर काही अडचण नाही असे विचारले त्यावेळी बगले यांनी मी जावून येतो आत असे म्हणाले. त्यावर मी त्यांना हात दोन मिनटं हे खिशात हायत माझ्या धान्यात नाही पिशवीत टाकायचं.. असे म्हणालो. त्यावेळी बगले यांनी मला श्री चौधरी यांचे कक्षात घेवून गेले व तेथे श्री.बगले यांनी त्याचे उजवे हाताचे तर्जनीवर अंगठा घासुन इशाराने लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता मी त्यांना माझ्या शर्टच्या वरील डावे बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढून समोर धरली असता ती त्यांनी त्याचे उजवे हाताने स्विकारुन समोर असलेले श्री चौधरी यांचे कडे देत असताना त्यांनी हाताने इशारा करून टेबलवर ठेवण्यास सांगितलेने बगले यांनी लाचेची रक्कम श्री. चौधरी यांचे समोरील टेबलवरील हिरव्या रंगाच्या फाईलचे खाली ठेवली. त्यावेळी श्री. चौधरी यांचे उघडया दारात थांबलेले पंच नं. 1 जाधव यांनी रक्कम स्विकारलेचे पाहून पोनि पवार यांचे मोबाईलवर मिसकॉल करून नियोजीत इशारा दिला. त्यानंतर कार्यालयाचे परिसरात सापळा लावून थांबलेले पोनि पवार, पोनि पिंगुवाले व सापळा पथकातील अंमलदार यांनी दुसरे मजल्यावर येवून त्यांची ओळख सांगून श्री. बगले यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि पवार यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला, ती वेळ 17.49 वा.ची होती. सदरवेळी पोहेकॉ/ मुल्ला यांनी तेथील प्राथमिक तपासण्याचे मोबाईलवर चित्रीकरण केले. त्यानंतर श्री. बगले यांना ताब्यात घेतल्यानंतर पोनि पवार यांनी त्यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. आमसिध्द इराण्णा बगले वय 50 वर्षे, पद राज्यकर निरीक्षक (एस.टी.आय) वर्ग 2 नेमणुक - वस्तु व सेवा कर कार्यालय सोलापूर रा. जी 171 रेणुका नगर, जुळे सोलापूर असे असल्याचे सांगितले. सदरवेळी पोनि पवार यांनी बगले यांना तक्रारदार यांच्याकडून स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली आहे याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याचे कक्षाचे शेजारीच असलेले श्री. चौधरी यांचे कक्षात जावून त्यांचे टेबलवरील हिरवे रंगाचे फाईलचे खाली असलेली लाच रक्कम काढून दाखविली. त्यावेळी पोनि पवार यांच्या सुचनेवरून बगले यांनी सदरची रक्कम काढून पंच क्र.2 चिंचोळ यांच्याकडे दिली. सदर रक्कम पोनि पवार यांच्या सूचनेवरुन पंच क्र.2 यांनी तपासून पाहिली असता, को-या कागदावर नंबर लिहून घेतलेल्या व अँन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेल्या नोटा असल्याचे दिसून आले. त्यावेळी पोनि पवार यांनी तेथे उपस्थित असलेले इसमास नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. महेश जरीचंद चौधरी वय 41 वर्षे, पद राज्यकर अधिकारी (एस.टी.ओ) वर्ग 2 नेमणुक - वस्तु व सेवा कर कार्यालय सोलापूर रा. प्लॉट नं. 18, हरिशचंद्र नगर, जुना उपळा रोड, धाराशिव असे असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि पवार यांनी श्री. बगले यांचे हाताची तसेच श्री. चौधरी यांचे टेबलवरील फाईलखाली मिळून आलेल्या नोटांचे, फाईलचे अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याच्या प्रकाशात दोन्ही पंचांच्या समक्ष तपासणी केली असता, सदर नोटांवर तसेच बगले यांचे उजव्या हाताच्या पेरावर ठिक ठिकाणी, टेबलावर तसेच फाईलचे खालील बाजूस अँन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसून आली.

त्यानंतर पोनि पवार यांनी चौधरी यांना माझे जीएसटीचे कागदपत्राबाबत विचारणा केली असता सदरचे कागदपत्र हे ऑनलाईन प्रणालीव्दारे प्राप्त होत असल्याचे सांगून त्यांचे कॉम्प्युटर मधून माझ्या जीएसटीचे कागदपत्राची प्रिन्ट काढून दिली. त्यानंतर पोनि पवार यांनी श्री बगले व श्री चौधरी यांचे वरीष्ठ अधिकारी श्री. सुरज सुरवसे सहाय्यक राज्य कर आयुक्त यांना समक्ष व सुधीर चेके राज्य कर आयुक्त यांना फोनव्दारे माहिती देवून आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आलो. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी दि.21/08/2025 रोजी 14.45 वा ते 17.49 वा चे दरम्यान लोकसेवक 1) महेश जरीचंद चौधरी वय 41 वर्षे, पद राज्यकर अधिकारी (एस.टी.ओ) वर्ग 2 नेमणुक - वस्तु व सेवा कर कार्यालय सोलापूर रा. प्लॉट नं. 18,



Scanned with OKEN Scanner

हरिशचंद्र नगर, जुना उपळा रोड, धाराशिव व 2) आमसिध्द इराण्णा बगले वय 50 वर्षे, पद राज्यकर निरीक्षक (एस.टी.आय) वर्ग 2 नेमणुक - वस्तु व सेवा कर कार्यालय सोलापूर रा. जी 171 रेणुका नगर, जुळे सोलापूर यांनी मला नवीन जी.एस.टी. क्रमांकास मंजूरी देणेकरिता माझेकडे 5000/- रू. लाचेची मागणी करून लाचेची रक्कम श्री. बगले यांनी स्विकारून ती लाच रक्कम श्री. चौधरी यांचे सांगणेवरून टेबलवरील फाईलखाली ठेवून त्या दोघांनी सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी कायदेशीर परिश्रमाखेरीज लाचेची मागणी करुन ती स्विकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dada Somnath Gaikawad(I (Inspector)) / DGPSGM7405 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस/ठाणे अमलदार
विजापूर नाका पोलीस ठाणे
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Dada Somnath Gaik

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** DGPSGM7405



Scanned with OKEN Scanner